जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 MAY 2017
लोकमत

# पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुपदी नितीन करमळकर यांची निवड

## शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुपदाची धुरा विद्यापीठातीलच पर्यावरणशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. राज्यपाल तथा कुलपती सी. विद्यासागर राव यांनी बुधवारी करमळकर यांच्या निवडीची घोषणा केली. ते गुरुवारी दुपारी सुत्रे स्वीकारणार आहेत.



डॉ. करमळकर हे मुळचे कोकणातील कणकवलीचे आहेत. त्यांचा जन्म सांगली येथे ११ जानेवारी १९६२ मध्ये झाला. त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण मिरज येथे झाले. त्यानंतर त्यांनी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथून भूगर्भशास्त्र या विषयात बी.एस्सी. केले. पुढे पुणे विद्यापीठातून एम.एस्सी व पीएच.डी. प्राप्त केली आहे.

हिमालयामध्ये अग्निजन्य खडक या विषयावर त्यांनी पीएच.डी. केली आहे. त्यांना अध्यापन क्षेत्रातील २९ वर्षांचा अनुभव आहे.

"मी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचाच विद्यार्थी आहे. त्यामुळे इथल्या विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची मला पूर्ण जाणीव आहे. विद्यापीठातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त नोकऱ्या कशा मिळतील याकडे मी लक्ष देणार आहे. विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून काम करणार आहे."

- डॉ. नितीन करमळकर,
नवनिर्वाचित कुलगुरु,

मार्च २०१३ मध्ये त्यांची पर्यावरणशास्त्र विभागाच्या प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली. त्यांनी सिनेटचे सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे.

ऑस्ट्रेलिया, पूर्व आफ्रिका, जर्मनी, येमेन, इराण आदी देशांमध्ये त्यांनी संशोधनाचे काम केले असून आंतरराष्ट्रीय परिषदांमधून ९ पेपर प्रकाशित केले आहेत. त्यांची आतापर्यंत ६ पुस्तके व ३४ शोधनिबंधही प्रकाशित झाले आहेत. बेंगलोरच्या जिओलॉजिकल सोसायटीचे ते कौन्सिल मेंबर आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 8 MAY 2017
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांची निवड

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठ एम. बी. ए अधिविभाग मध्ये कॅम्पस इंटरव्ह्यूचे शनिवार १३ मे रोजी आयोजन करण्यात आले होते. कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन हे 'जस्ट डाईल' कंपनीचे जिल्हा व्यवस्थापक अरिफ शिकलगार यांच्या सहयोगाने आयोजित करण्यात आले होते. एमबीए अधिविभागामध्ये घेण्यात आलेल्या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये 'जस्ट डाईल' या नामांकित कंपनीमध्ये केतन परदेशी, रोहन कुलकर्णी, अभिषेक पाटील, प्रतीक बागवाले आणि संजयकुमार भोसले या विद्यार्थ्यांची निवड झाली. कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन शिवाजी विद्यापीठाच्या सेंट्रल प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. पी. एन. भोसले आणि एम. बी. ए विभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते. प्लेसमेंट ऑफिसर संकेत रावण यांनी कॅम्पस इंटरव्ह्यू यशस्वीरित्या पार पाडला.